१९५

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक २२/११/२०२३

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.वितंप्र-३६१७/प्र.क्र.११/भाग-२/पोल-३, दिनांक १३ नोव्हेंबर, २०२३.

**विषय** :- पोलीस नियंत्रण कक्षाचे आधुनिकीकरण प्रकल्पाच्या प्राथमिक संपर्क केंद्रामध्ये करण्यात येणाऱ्या वीज, पाणी, देखभाल व दुरुस्ती इ. ची देयके आहरित करण्याबाबत.

******

**परिपत्रक** -

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.वितंप्र-३६१७/प्र.क्र.११/भाग-२/पोल-३, दिनांक १३ नोव्हेंबर, २०२३ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२३१११३१६३२२००५२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक(नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहायक पोलीस महानिरीक्षक(नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यासन अधिकारी, का.क्र.१७

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "वित्त व लेखा " या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**पोलीस नियंत्रण कक्षाचे आधुनिकीकरण प्रकल्पाच्या प्राथमिक संपर्क केंद्रामध्ये करण्यात येणाऱ्या वीज, पाणी, देखभाल व दुरुस्ती इ. ची देयके आहरित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः वितंप्र-३६१७/प्र.क्र.११/भाग-२/पोल-३,**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
दुसरा मजला, मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक : १३ नोव्हेंबर, २०२३

**वाचा :**

१) गृह विभाग,शासन निर्णय क्र. वितंप्र-३६१७/प्र.क्र.११/पोल-३, दि.०४.०९.२०१७.
२) गृह विभाग,शासन निर्णय क्र. वितंप्र-३६१७/प्र.क्र.११/भाग-२/पोल-३, दि.०३.१२.२०१९.
३) गृह विभाग,शासन निर्णय क्र. वितंप्र-३६१७/प्र.क्र.११/भाग-२/पोल-३, दि.३०.३.२०२१.
४) अपर पोलीस महासंचालक (नि.व स.) यांचे क्र. पोमसं/१७/६१६२/MERS-डायल-११२/८१/२०१७, दि.९.१०.२०२३ चे पत्र.

**प्रस्तावना** :- राज्यातील पोलीस नियंत्रण कक्षांचे आधुनिकीकरण प्रकल्पामुळे आपत्कालीन परिस्थितीच्या ठिकाणी ग्लोबल पोझीशनिंग सिस्टीम (GPS) किंवा तत्सम यंत्रणेच्या आधारे तात्काळ वाहन उपलब्ध करुन देणे शक्य होणार असून सुधारित आणि अद्ययावत तंत्रज्ञानाच्या वापरामुळे नागरिकांना आपत्कालीन सेवा उपलब्ध करून देण्यासाठी लागणारा वेळ कमी होणार आहे. तसेच आपत्कालीन यंत्रणेशी मोबाईल ॲप्लीकेशन, एस.एम.एस., ईमेल, चॅट इत्यादी माध्यमातून संपर्क साधण्याची सुविधा उपलब्ध असणार आहे. या बाबी विचारात घेवून राज्यातील पोलीस नियंत्रण कक्षांचे आधुनिकीकरण, बळकटीकरण करण्याबाबतच्या प्रस्तावास दिनांक ३ ऑगस्ट, २०१७ रोजी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. त्यानुसार राज्यातील पोलीस नियंत्रण कक्षांचे आधुनिकीकरण प्रकल्पास व त्यानुषंगाने वरळी, मुंबई येथे संनियंत्रण, नियोजन व विश्लेषण केंद्र उभारण्यासाठी गृह विभाग, शासन निर्णय दि.०४.०९.२०१७ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

राज्यातील पोलीस नियंत्रण कक्षांचे आधुनिकीकरण प्रकल्पाच्या प्राथमिक संपर्क केंद्रासाठी (Primary Contact Center) आवश्यक जागेकरिता संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये मिलेनियम बिझनेस पार्क, महापे, नवी मुंबई येथील इमारत क्र.७ (तिसरा व चौथा मजला), सेक्टर-३, सेलेबल बिल्टअप क्षेत्र २७३६४ चौरस फूट ही जागा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचेकडून उपलब्ध करुन घेण्याकरिता तसेच यासाठी येणाऱ्या रु.९,०३,९१,४१२/- एवढ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. प्रकल्पाच्या प्राथमिक संपर्क केंद्रातील विद्युत मिटर पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांचे नावे असल्यामुळे डायल-११२ प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर प्राथमिक संपर्क केंद्रामध्ये करण्यात येणाऱ्या वीज जोडण्याकरिता येणारा खर्च (Security Deposit) तसेच दरमहा येणारी वीजेची देयके अदा करण्यासाठी पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांना "नियंत्रक अधिकारी" व त्यांच्या अधिनस्त आहरण व संवितरण अधिकाऱ्याला "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून संदर्भ क्र. ३ च्या शासन निर्णयान्वये घोषित करण्यात आले आहे. आता पोलीस महासंचालक कार्यालयाने संदर्भ क्र. ४ च्या पत्रान्वये डायल ११२ प्रकल्पाच्या प्राथमिक संपर्क केंद्राचे पाणी बील व कार्यालयाचे देखभाल बील मंजूरीबाबत प्रकल्पाच्या प्राथमिक संपर्क केंद्रातील वीजेची देयके, पाण्याची देयके व देखभाल दुरुस्तीची देयके आहरीत करण्यासाठी पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांना "नियंत्रण अधिकारी" व त्यांच्या अधिनस्त आहरण व संवितरण अधिकाऱ्याला "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्याबाबत प्रशासकीय मान्यतेचे शासन आदेश निर्गमित करण्याची विनंती केली आहे. त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

Scanned with CamScanner

**<u>शासन निर्णय</u> :-**

राज्यातील पोलीस नियंत्रण कक्षांचे आधुनिकीकरण प्रकल्पाच्या मिलेनियम बिझनेस पार्क, महापे, नवी मुंबई येथील इमारत क्र.७ (तिसरा व चौथा मजला), सेक्टर-३, सेलेबल बिल्टअप क्षेत्र २७३६४ चौरस फूट येथील प्राथमिक संपर्क केंद्रामध्ये (Primary Contact Center) करण्यात येणाऱ्या वीज जोडणीकरिता येणारा खर्च (Security Deposit) तसेच दरमहा येणारी वीजेची देयके तसेच पाण्याची देयके व देखभाल दुरुस्तीची देयके आहरित करण्यासाठी पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांना "नियंत्रक अधिकारी" व त्यांच्या अधिनस्त आहरण व संवितरण अधिकाऱ्याला "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे. संदर्भाधिन क्र. ३ येथे नमूद दि. ३०.३.२०२१ रोजीचा शासन निर्णय या शासन निर्णयान्वये अधिक्रमीत करण्यात येत आहे.

२ सदर खर्च मागणी क्र.बी-१, २०५५-पोलीस, (००) १०९, जिल्हा पोलीस, (००) (०१) जिल्हा पोलीस बल (२०५५ ०१६८) (दत्तमत)(अनिवार्य) या लेखाशीर्षाखालील ०६, दूरध्वनी, वीज व पाणी शुल्क या उदिष्टाखाली भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३१११३१६३२२००५२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RUPALI SANJOG KABARE

Digitally signed by RUPALI SANJOG KABARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=825ec39543f0d33deccec30f6ca54b1adc430443efec55f07e98dc173423779d, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5CB43A03D973FF96AABBF02A74864A4681399FE663D8FBDE0441A596BEB3ACDD, cn=RUPALI SANJOG KABARE
Date: 2023.11.13 16:31:32 +05'30'

**( रुपाली कबरे )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री, (गृह) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव (उदयोग) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव (विशेष) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
८. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळ, उद्योगसारथी, अंधेरी, मुंबई.
११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
१२. जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई. / नवी मुंबई
१३. वित्त विभाग, व्यय-७/वित्तीय सुधारणा, मंत्रालय, मुंबई.
१४. कक्ष अधिकारी (अर्थसं-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. निवडनस्ती, पोल-३.



Scanned with CamScanner